RNI No. MAHBIL/2009/31743

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार—ब

वर्ष ७, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ४-१०, २०२१/माघ १५-२१, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी २०२१

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक पीएसबी.०३१४/प्र.क्र. ३५४(भाग-२)/पोल-५अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम, (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) नियम, १९९५ यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :–

१. या नियमांस " पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०२१ " असे म्हणावे.

२. पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, १९९५ याच्या नियम ३ मधील खंड (क) मध्ये, उप-खंड (एक) व उप-खंड (एक) चा पहिला परंतुक याऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो १९ डिसेंबर २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

(एक) " आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस एकोणीस वर्षापेक्षा कमी वय नसेल व एकतीस वर्षापेक्षा अधिक वय नसेल :

परंतु, मागास वर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा चौतीस वर्षापर्यंत शिथिल करता येईल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. मा. भट,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 22nd January 2021.

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. PSB.0314 /CR-354 (Part-II)/ Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules further to amend the Police Sub-Inspector (Recruitment) Rules, 1995, as follows, namely :—

1. These rules may be called the Police Sub-Inspector (Recruitment) (Amendment) Rules, 2021.

2. In rule 3 of the Police Sub-Inspector (Recruitment) Rules, 1995, in clause (*c*), for sub-clause (*i*) and the first proviso to sub-clause (*i*), the following shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 19th December 2016, namely :—

(*i*) " not be less than nineteen years of age and not more than thirty-one years of age on the date specified by the Commission :

Provided that, the maximum age limit may be relaxed upto thirty-four years in respect of candidates belonging to the Backward Classes :"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.